Volume - 4 (2023)
Special Issue - 2 (April)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# वैदिक काळात स्त्रियांना असणारे अधिकार

**प्रा. संजय के. वैरागड**
ग्रंथपाल
अशोक मोहरकर कला आणि
वाणिज्य महाविद्यालय, अडयाळ
तह. पवनी, जि. भंडारा
Email- sanjayvairagade123@gmail.com

**प्रस्तावना —**

भारतीय स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत स्त्रियांसाठी बऱ्याच अधिकाराची अंमलबजावणी केली. स्त्रियांना बरेच अधिकार दिले. स्त्री—पुरूष समानतेला तर खूप महत्व दिल्या गेले. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवत आहे. परंतु असे असूनही ती आजही उपेक्षितच आहे. अनेक विचारवंतानी, सामाजिक, कार्यकर्त्यांनी अनेक प्रयत्न केले त्यांच्या प्रयत्नामुळे स़्त्रीया आज बऱ्याच क्षेत्रात प्रगती करीत आहेत. परंतू आजही तिला दुय्यम दर्जाचीच वागणूक देण्यात येत आहे. उपेक्षितपणानेच वागविल्या जात आहे. स्त्री—पुरूष समानता फक्त नावालाच आहे. आज स्त्रीवरील अन्याय अत्याचार यामद्ये वाढ झालेली आहे. स्त्री ही सर्व ठिकाणी दुराचारी वृत्तीला बळी पडत आहे. पण, भारतीय इतिहासात जर डोकावून पाहिले तर वैदिक काळात स्त्रीचे समाजातील स्थान उच्च होते. वैदिक कालखंडात हिंदू समाजाचा सूवर्णकाळ मानला जातो. स्त्रीयांची स्थिती केवळ चांगली नव्हती तर अत्यंत चांगली होती. वैदिक साहित्यावरुन असे दिसून येते की त्यावेळी स्त्रीयांची स्थिती आत्मविकास, शिक्षण, विवाह, संपत्ती, हया बाबतीत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. जे अधिकार व स्वातंत्र्य पुरूष्यांना होते तेच स्वातंत्र व अधिकार स़्त्रीयांना होते. पुरूषांसमान त्याही सर्व अधिकार उपभोगत होत्या. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राात पुरूषांच्या बरोबरीने समानतेने स्वातंत्र्य त्या मनमुराद उपभोगात होत्या. वैदिक काळात मुलांप्रमाणे मुलींही गुरूकूलात राहून शि़क्षण घेत होत्या. शिक्षण घेतल्यामुळे त्या शिक्षित व सुसंस्कृत होत्या. स्त्रियांच्या शिक्षणाला त्या काळात अत्यंत महत्त्व होते. त्यामुळेच स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने आदराची व सन्मानाची वागणूक मिळत असे.

आळतेकराच्या मते, स्त्री ही आर्थिक बाबतीत अधिक क्रियाशील सहभाग घेत असे व धार्मिक कार्यांत देखील सहभाग दर्शवित असे. तसेच उपनयन संस्काराबाबतचे अधिकारही तिला होते. वैदिक काळात स्त्रियांना गौरवपूर्ण स्थान प्राप्त झाले होते. विधवाबाबत तत्कालीन समाजाचा दृष्टिकोन उदारमतवादी होता. विधवा स्त्री पूनर्विवाह करू शकत होती. विवाह न करता चिरकाल ब्रम्हचर्य पाळून राहणाऱ्या स्त्रियांकडे समाज आधुनिक काळाप्रमाणे उपहासाने व वाईट दृष्टिने पाहात नसत. वैदिक काळात स्त्रियांना सन्मानाने वागविले जाई. त्यांच्याकडे उदार दृष्टिकोनातून पाहिले जाई. स्त्री ही घरची सम्राज्ञी आहे. हा वैदिक संस्कृतिचा आदर्श होता. स्त्रीचा दर्जा उच्च होता हे मोहंजोदारो व हडप्पा येथील सापडलेल्या शिल्पावरून स्पष्ट होते.

**महत्व —**

वैदिक काळामध्ये पुरूषांप्रमाणे स्त्रियांना तेव्हा स्वतंत्र, बौध्दिक व आत्मिक जीवन होते. या जीवनाला आवश्यक असे उच्च शिक्षण त्यांना मुलांच्या बरोबरीने मिळत असे. स्त्री विद्यार्थीनीचे दोन गट असत. सद्योद्वाहा व ब्रम्हवादिनी सद्योद्वाहा प्रकारच्या विद्यार्थीनी सोळाव्या वर्षापर्यंत शिक्षण घेऊन मग अनुरूप पतीशी विवाह करीत. ब्रम्हवादिनी स्त्रिया विवाह न करता वा विवाहानंतरही उच्च शिक्षण घेत असत. ब्रम्हचर्याच्या काळात योग्य शिक्षण घेतल्याने मुलीला योग्य पती मिळतो. असा स्त्री शिक्षणाची प्रतिष्ठा करणारा समाज त्यावेळचा होता. उपनयनानंतरच्या आठ — नऊ

वर्षांच्या काळात हया स्त्रिया वैदिक स्त्रोते व नित्य नैमित्तिक कृत्यांना लागणारी सुत्रे मुखोद्गत करीत. उच्च दर्जाची पंडिता होणे हे ब्रम्हवादिनी स्त्रियांचे ध्येय असे.

ब्रम्हवादिनीपैकी काही वेदांचे अध्ययन करीत तर काही वेदांत तत्वज्ञानाचा व्यासंग करीत. अशा अत्यंत गहन विषयाचे ज्ञान संपादन केल्यामुळे ऋग्वेदातील कित्येक सुक्तांची रचना त्या काळी स्त्रियांनी केली आहे. विश्ववारा ही तत्वज्ञ आणि पवित्र धार्मिक ग्रंथामध्ये पारंगत असल्याचे वर्णन आहे. तिने पाचव्या मंडलातील २८ वे सूक्त केले आहे. घोषाने १० व्या मंडलातील ३९ वे व निवावीने ४० वे सूक्त केले आहे. ती त्यात म्हणते, 'हे अश्वी हो, आईबाप पूत्राला देतात, त्याप्रमाणे मला शिक्षण दया.'(ऋग्वेद).

या महान स्त्रियांप्रमाणे, अपाला, लोपामुद्रा, शिक्ता, अश्वलायना हया विदूषीनी ऋग्वेदातील काही सूक्तांची रचना केलेली आहे.

अथर्ववेदानुसार स्त्रीचे वैवाहिक यश हे तिला तिच्या ब्रम्हचर्यात मिळालेल्या योग्य शिक्षणावर अवलंबून असते. उपनिषद काळात तत्वज्ञानाच्या सखोल ज्ञानाने समृध्द असलेल्या अनेक महान ब्रम्हवादिनी स्त्रिया होत्या.

गार्गी आणि मैत्रेयी यांनी त्यांच्या महान विचारवंत व तत्वज्ञानी पतीला, याज्ञवल्क्याला अनेकवेळा अत्यंत कठिण आवाहनात्मक प्रश्न विचारून भंडावून सोडल्याची वर्णने आहेत. डॉ.आर. सी. मजुमदार यांच्या मते, गार्गी, मैत्रेयी व याज्ञवल्क्या याच्यामधील तत्वज्ञानांवर विचारमंथनावर झालेल्या चर्चा प्राचीन भारतातील स्त्रियांच्या उच्च शैक्षणिक दर्जाचा आणि बौध्दिक कौशल्याचा प्रभावी पुरावा आहे. या पुराव्याला जागतिक इतिहासात दुसरे समांतर उदाहरण सापडणे कठिण आहे.

ऋग्वेदकाळात व्याकरणकारांना स्त्री — गुरूंशी चर्चा करण्याचे प्रसंग येत स्त्रिया ज्ञानदानाचे, मंत्रघोषाचे व वेदपठनाचे काम करीत. विवाहापूर्वी व विवाहानंतरही स्त्रियांना ६४ कला अवगत करण्याची मुभा होती. अध्यापन करणाऱ्या स्त्रिया बऱ्याच असाण्यात म्हणून संस्कृत व्याकरणकारांनी गुरूपत्नींना 'उपाध्यायिनी' व स्त्री गुरूंना 'उपाध्याया' म्हणून स्पष्ट दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

ऋग्वेदकाळात स्त्रियांच्या पोशाखात दोन व तीन वस्त्रे असत. वस्त्रे कापूस, व लोकर व रेशीम यांच्यापासून बनविलेली विविध रंगी असत. कमरेभोवती गुडाळलेली 'नीवी', अंगात घातलेले 'वासस' व त्यावर परिधान केलेले 'अधिवासस' यांच्या वस्त्रांत समावेश असे. केसांना तेल लावून केस विंचरण्याची प्रथा होती. स्त्रिच्या केसाचा अंबाडा बांधित. केशभूषेसाठी गजरे, वेण्या, पुष्पमाला यांचा स्त्रिया मोठया प्रमाणावर वापर करीत. अंगकाती वाढविण्यासाठी स्त्रिया मोठया प्रमाणावर वापर करीत. स्नानानंतर केसांना धूपवित. ऋग्वेद काळात स्त्रीयाही कपाळावर चंदनाचा तिलक लावीत. डोळयात अंजन घालीत. गालावर वा हनुवटीवर काळा तीळ रेखीत, ओठांना आळित्याने रंगवित. नखांना व पायांनाही आळित्याने रंगवित. सोनार सोने, चांदी, रत्ने व मोती यांच्यापासून विविध प्रकारचे कलात्मक अलंकार बनवित. स्त्रिया बाहूभूषणे, कंकणे कंठे, कर्णफूले, पैजणे आदी अलंकार घालीत असत. स्त्रिया पुष्पप्रसाधनाचाही सढळ हाताने वापर करीत असत.

विशेष आनंदोत्सवाच्या प्रसंगी स्त्रीपुरूष सामूहिक नृत्यात त्या मुक्त मनाने सहभागी होत असत. विविध वादयांच्या संगीतसाथीने तालबद्ध नृत्य व गायन होत असे.

यावरून त्या काळात स्त्रीयांना मुक्त हालचालीचे, स्वातंत्र्यांचे अधिकार होते. हे लक्षात घेण्याजोगे आहे. स्त्रीला घरात व समाजात मानाचे स्थान होते. 'स्त्री म्हणजे घराचे सर्वस्वच' जाया इद अस्तम। असे विश्वामित्र सांगतात. मुलगी, पत्नी, माता व एक स्त्री अशा सर्व रूपात स्त्रीला प्रतिष्ठा होती.

**निष्कर्ष —**

वैदिक काळात स्त्री घराची स्वामिनी मानली जाई. धर्मकृत्यामध्ये स्त्री पतीची सहधर्मचारिणी होती. मेजवान्या आणि नृत्यप्रसंगी कसलाही आडपडदा न बाळगता स्त्रिया समाजात मिसळत असत. मुलाइतकीच मुलीच्याही शिक्षणाची काळजी घेतली जाई. स्वत:च्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रसंगी मुलगी अविवाहीत राहू शके. ऋग्वेदकाळातील स्त्रीला उपनयनाचा अधिकार असून वेदाध्ययनाचे शिक्षणाचे पूर्ण स्वातंत्र्य होते. ऋग्वेदातील अनेक सूक्ताची रचना तत्कालीन विदुषीनी केलेली आहे, त्यावरून त्यांच्या उच्च शैक्षणिक दर्जाजी व सामाजिक प्रतिष्ठेची कल्पना येते. विदिशाचा राजा जनक याच्या दरबारात गार्गीच्या नेतृत्वाखाली ब्रम्हवादिनी स्त्रियांचे एक दल होते. त्याकाळात क्वचितप्रसंगी स्त्री आपाल्या पतीबरोबर युद्धावरही जात असे.

ऋग्वेदकाळात पडदापद्धती व सतीची चाल अस्तित्वात नव्हती. विवाह हा पवित्र धार्मिक संस्कार मानला जाई. साधारणत: लोक एकपत्नीव्रत पाळीत. पुत्रोत्पत्तीला महत्व असल्यामुळे पुरूषाला अनेक स्त्रियांशी विवाह करण्याची अनुमती शास्त्रकारांनी दिली होती. श्रीमंत लोकात व राजघराण्यात बहुपत्नीकत्व सर्रास रूढ होते. आपल्या पतीची निवड करण्याचे स्वातंत्र्य स्त्रीला होते. सामान्यत: विवाह प्रौढ वयातच होत असत. पुष्पकळदा मुलगी आपल्या पसंतीचा वर शोधून काढी. याचा अर्थ असा होतो की, ऋग्वेदकाळात स्त्रियांना विवाहाच्या बाबतीत पूर्ण स्वातंत्र्य होते. विवाहात कन्यादानाला अत्यंत महत्व होते. मुलींनी विवाह केलाच पाहिजे असे बंधन नव्हते. परंतु विवाह करून पतिगृही जाणे हे स्त्रीचे कर्तव्य आहे. अशी धोरणा तेव्हा समाजात प्रचलित होती. ऋग्वेदकाळात आर्याच्या तिन्ही वर्णात अतिशय मोकळेपणाने रोटीबेटी व्यवहार चालत होता. त्या काळात वैवाहिक नीती अतिशय उच्च दर्जाची असून तिचे अत्यंत काटेकोरपणे पालन होत असे.

पितृसत्ताक कुटुंबपद्धतीमुळे स्त्रियांना फारसे आर्थिक अधिकार नव्हते. जर कुटुंब विभक्त होण्याची वेळ आली तर पित्याच्या मिळकतीत अविवाहीत कन्येला वाटा मिळत असे. निपूत्रिक पित्याची मिळकत मुलींच्या मुलाकडे जात असे. ऋग्वेदकाळात पुरूषांच्या बरोबरीत स्त्रियांना अधिकार होते. त्याकाळात स्त्रियांकडेसुद्धा सन्मानाने पाहिल्या जाई. वैदिक काळात अनेक प्रसिद्ध स्त्रियांचा शिक्षणात, व्यवहारात उल्लेखनीय कार्य केल्याचा उल्लेख आहे. त्या काळी अनेक पुरूष ऋषींनी, मानवी इच्छा, आकांक्षा, व्यावहारीक अपेक्षा त्यांच्या सूक्तांतून मोकळेपणाने मांडल्या आहेत, तशाच ऋषिकांनीही आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या आहेत. एक चांगला नवरा, नवऱ्याचे प्रेम, चांगले स्वास्थ एवढीच त्यांची गरज आहे. स्त्रियांच्या या पहिल्या लिखित उद्धारांमधूनही त्यांच्या स्त्रीत्वाची झलक बघायला मिळते. तसेच ऋषिकांच्या लेखनात तत्कालिन कौटूंबिक जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. आपल्या मुला — नातवंडाची इच्छा, ते पराक्रमी आणि संपन्न असावेत अशी अपेक्षा ऋषिकांनी वेदातल्या काही सूक्तांमधून पून्हा पून्हा केलेली दिसते. पुरूषांप्रमाणे शिक्षण घेऊन अनेक बुद्धीवंत स्त्रियांनी आपल्या बुद्धीमतेची चुणूक दाखविली हे गार्गी, मैत्रेयी, विश्ववारा, सुलभा यांसारख्या महान बुद्धिचार्तूय असणाऱ्या स्त्रियांच्या उदाहरण लक्षात येते.

**सारांश —**

वैदिक काळ हा स्त्रियांसाठी अनुकूल व आदर्श असा काळ होता. भिन्न भिन्न समाजाचा चिकित्सक अभ्यास व संस्कृतीचे विश्लेषण केले तर स्त्रियांचे स्थान, दर्जा, भूमिका व कार्याचा त्या त्या स्थितीतील आढावा घेता येतो. ती स्वावलंबी आहे की परावलंबी? यावर देखील तिचे स्थान व तिच्या वाटयाला येणारा संघर्ष अवलंबून होता पण त्याचे स्वरूप आजच्या इतके विकृत व विभस्त नव्हते, एवढे मात्र खरे! वैदिक काळात स्त्रियांना उच्च स्थान होते. पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण घेण्याचे अधिकार होते व त्याचाच परिणाम म्हणजे समानतेवर आधारित समाजरचना होती.

वैदिक काळ हा स्त्रियांच्या उन्नतीचा व मानसन्मानाचा काळ होता. त्यामुळे पुरूषांप्रमाणेच सगळे अधिकार स्त्रियांना प्राप्त होते. बालविवाह प्रचलित नव्हते. विधवा स्त्री पूर्नविवाह करू शकत होती. स्त्रियांच्या पावित्र्यापेक्षा वंशसंरक्षणास महत्व होते. पती षंढ असल्यास स्त्रिया इतर पुरूषांपासून संतती उत्पन्न करू शकत असत. आदिवासी संस्कृतीशी मिळती जुळती ही परंपरा होती. एवढा उदारमतवादी दृष्टिकोन त्याकाळी स्त्रियांप्रती होता. त्याकाळी स्वयंवर प्रथा असल्याने जोडीदार निवडण्याचे पूर्ण अधिकार व स्वातंत्र्य स्त्रियांना होते. ब्राम्हय व प्रजापत्य हे दोन विवाहप्रकार लोकप्रिय होते. थोडक्यात स्त्रियांची भूमिका गृहिणी, सखी, प्रेयसी, सहचारिणी, मार्गदर्शिका या स्वरूपाची होती. एकूणच स्त्री—पुरूष भेदभाव नव्हता. म्हणून ती व तिचा समाज त्याकाळी उन्नत अवस्थेत होता.

**गृहितके —**

- वैदिक काळात स्त्रियांना असणाऱ्या अधिकाराविषयी माहिती करून देणे.
- वैदिक काळातील विविध तत्वज्ञानी, प्रसिद्ध महान स्त्रीयांची ओळख करून देणे.
- स्त्रीयांना पुरूषाप्रमाणेच समान अधिकार असायला हवे. याची माहिती वैदिक कालखंडातून करून देणे.

**संदर्भग्रंथः—**


- **डॉ. प्रा.गंगणे वर्षा** :— स्त्री सक्षमीकरण दशा आणि दिशा<br>साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर<br>११ जुलै २०१८
- **डॉ. देशपांडे शीला** :— कुटुंबसंस्था आणि परित्यक्ता स्त्री<br>श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर<br>११ सप्टेंबर २०११
- **डॉ. आचार्य धनंजय** :— प्राचीन भारत (प्रारंभापासून इ.स. १२०० पर्यंत)<br>श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर<br>जानेवारी २००५
- **डॉ. आगलावे प्रदीप** :— भारतीय समाज<br>श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर<br>जुलै २००९
- **डॉ. कऱ्हाडे बी.एम.** :— भारतीय समाज प्रश्न आणि समस्या<br>पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर<br>जून २००९
- **डॉ. मेहेत्रे स्मीता** :— भारतीय स्त्री आणि मानवाधिकार<br>श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर<br>जुलै २०११
- **डॉ. टेंभेकर नलिनी** :— प्राचीनकालीन व मध्यकालीन भारतीय राज्य<br>संजय ठाकरे सर साहित्य केंद्र, नागपूर<br>२०१५
- **डॉ. आचार्य धनंजय** :— भारताचा इतिहास १५२६ — १९४७<br>श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर<br>एप्रिल २००६